संशोधन रूपरेषा

(आराखडा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केल्या जाणारा संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

“शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास”

संशोधक

बालाजी ग्यानोबा कांबळे

एम.ए.बी.एड, ‘नेट’

मराठी विभाग

दूर व मुक्त अध्ययन संस्था (Idol)

मुंबई विद्यापीठ, मुंबई

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे

श्री.हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ता. उदगीर जि.लातूर

अभ्यासकेंद्र

श्री.हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

एप्रिल 2022

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना

2. संशोधन समस्या आणी ग्रहीतके

3. अभ्युपंगमात्मक विधान

4. संशोधनाची उदिष्टये

5. संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा-संकल्पना

6. संशोधन पद्धती

7. संशोधन पूर्व अभ्यासाचा आढावा

8. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

9. तात्पुरती प्रकरण व्यवस्था

10. संदर्भग्रंथ सूची

“शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास”

प्रस्तावना :

कोणत्याही विषयाचे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी त्या विषयाच्या मुळात जाऊन त्याचा शोध घेणे अतिशय गरजेचे असते कोणतेही संशोधन कार्य हे पूर्णत्वास नेण्यासाठी संशोधकास अत्यंत गुंतागुंतीतून जावे लागत असते. एखाद्या विषयाचा अभ्यास करीत असताना त्या विषयास अनुसरून इतर माहितीच्या पटाचा अभ्यास करावा लागतो. प्रत्येक घटना घडामोडी घडत असतात तसेच त्यातून प्रत्येक टप्प्यावर नवनव्या समस्या आणि नवे गतिरोध जन्मास येतात. एखादी घटना घडामोडी घडत असताना मानवी जीवनाचा पूर्ण आलेख त्यातून उलघडून निघत असतो, मराठी साहित्याच्या अनुषंगाने विचार केला असता, साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा आहे आणि हे मानवी जीवनाचे खरे वास्तवदर्शन हे आपणास साहित्याच्या माध्यमातून आविष्कार होत असते, त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक कविता, यातून एकूणच मानवी जीवनाचे दर्शन दिसून येत असते, त्यातील आपणास एकोणीसशे साठच्या कादंबरी या वाङ्मय या प्रकारचा अभ्यास करीत असताना मराठी साहित्यातील कादंबरीचे वळण कसे कसे बदलत गेले या नुसार जर आपण विचार केला तर जे उपेक्षेत समाज होता त्यांच्या जीवन परिचय आपणास साठोत्तरी मराठी साहित्यातून दिसून येतो. शंकर भाऊ साठे सारख्या लेखकानी बारा कादंबऱ्या लिहूनही समीक्षक, अभ्यासक आणि विद्यापीठांची अभ्यास मंडळे यांनी त्यांच्या साहित्याची दखल घेतली नाही तसेच साहित्याने समाज जीवनात माणूस आणि साहित्यिक म्हणूनही त्यांची उपेक्षा झाली. ती संशोधनाच्या माध्यमातून दूर व्हावी म्हणून “शंकरभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास” या विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

शंकर भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने वयाच्या चाळीसाव्या वर्षी हातात लेखणी घेऊन अण्णा भाऊ सोबत महाराष्ट्राच्या चळवळीत महत्वाचे योगदान दिले आहे. परंतु अशा या महान कादंबरीकरांची मराठी समीक्षकाने त्यांची दखल मात्र घेतली नाही. त्यानी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने भाग घेतला आहे, त्यांच्या एकूण बारा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्यावर मार्क्सवादी

विचारसरणीचा प्रभाव होता त्यातूनच त्यानी आपले लिखाण कार्य शेवटपर्यंत चालू ठेवले आहे.

शंकर भाऊ साठे यानी एका उपेक्षित समाजाला आपल्या कादंबरी लेखनाच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. शंकर भाऊ साठे यानी अंधारात पिढ्यानपिढ्या चाचपडत असलेल्या, गुलामीत जगणाऱ्या समाजाला आपल्या लिखानाच्या माध्यमातून त्याना गुलामीची जाणीव करून दिली. त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले. स्वत: आयुष्यभर कशाचीही अपेक्षा न करता समाजाचा उद्धार करण्यात आपले आयुष्य खर्च केले. समाजात वाढत चाललेला अज्ञान, अधश्रद्धा, गुलामी, दारिद्र्य, यातून त्यानी समाजाला नवप्रेरणा आपल्या लिखाणाच्या माध्यमातून सर्व दूर पोहचवली आहे. समाजातील या अंधश्रद्धेला दूर करण्याचे महान कार्य शंकर भाऊ साठे यांनी केले आहे, शंकर भाऊ साठे यांनी अण्णा भाऊ साठेंचा विचार सर्वदूर पोहचवण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कादंबरीतील विश्व हे वेगळे आहे. मराठी साहित्यातील पारंपरिक कादंबरीपेक्षा वेगळा विषय हा शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीचा आहे.

संशोधन समस्या आणि गृहितके :

1. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास करीत असताना इतर कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास करावा लागतो, त्यामुळे संशोधनाचा आवाका वाढण्याची दाट शक्यता आहे.
2. कादंबरी हा वाङ्मय प्रकार हा अभ्यासताना मराठी साहित्यातील कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
3. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीचा विवेचक अभ्यास करीत असताना 1960 च्या नंतर ज्या दलित लेखकाने कादंबरी लेखन केले आहे त्यांचा ही अभ्यास करणे आवश्यक आहे, ते करीत असताना अडचणी येऊ शकतात.
4. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीचा अभ्यास करीत असताना इतर काही कादंबरीकरांचा अभ्यास करावा लागतो.
5. एकूणच मराठी वाङ्मयाचा अभ्यास करीत असताना कादंबरी वाङ्मयाच्या प्रकाराचा अभ्यास करावा लागतो त्यामुळे संशोधनाचा आवाका वाढण्याची शक्यता आहे.

गृहितके :

1. प्रसिद्ध साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांच्या विचार श्रणीतून शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा उदय झाला
2. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतून उपेक्षित समाजाचे दु:ख चित्रित झाले आहे.
3. प्रस्थापित आणि विस्थापित यांच्यातील संघर्ष त्यांच्या कादंबरीत पहावयास मिळतो.
4. इंग्रजी राजवटीचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून आलेले पहावयास मिळते.
5. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या चरित्रात्मकतेकडे अधिक झुकताना दिसून येतात.

मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने १९६० नंतर डॉ. बाबांसाहेबांची प्रेरणा घेऊन दलित तरुण जागा झाला आणि आपल्यावर होता असलेल्या अन्याय अत्याचार दूर करण्याच्या प्रयत्नातून साहित्याच्या माध्यमातून आविष्कार करू लागला. त्या मध्ये दया पवार, वामन होवाळ, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, वामन मेश्राम, राजा ढाले, गंगाधर पानतावणे, ही दलित तरुण मंडळी, शिक्षण शिकली आणी हातात पेन घेऊन समाजावर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी समाज जागा करण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या साहित्य प्रवाहातून लिखाण कार्य करण्यास सुरुवात केले आणि त्यातून दलितांची दु;खे ते आपल्या कथा, कादंबरी, कवितेच्या माध्यमातून मांडू लागली. त्यामध्ये अण्णा भाऊ साठे यांचे धाकटे बंधु शंकर भाऊ साठे यानी आपल्या लिखानाच्या माध्यमातून मातंग समाजाची दुख, इतर समाजापेक्षा कशी वेगळी आहेत, हे त्यांनी आपल्या कादंबरी वाङ्मयाच्या माध्यमातून समाजासमोर ठेवण्याचे महान कार्य केले आहे, त्यानी केलेल्या कार्याचा सखोल आढावा संशोधनाच्या माध्यमातून घेण्याचा माझा प्रयत्न आहे.

संशोधनाची उदिष्टये :

1. कादंबरी साहित्य वाङ्मयाचे उगम स्थान, प्रेरणा, प्रभाव व वेगळेपणाचा शोध घेणे.
2. दलित कादंबरीकार म्हणून शंकर भाऊ साठे यांची सामाजिक फलश्रुती काय आहे याचा शोध घेणे .

3. शंकरभाऊ साठे यांच्या वाङ्मयाचा व कार्याचा शोध घेणे.
4. कादंबरी वाङ्मयात शंकरभाऊ साठे यांचे वेगळेपण शोधणे
5. दलित कादंबरीकार म्हणून शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाचे महत्त्व महत्व विशद करणे.

विवेचनासाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा -संकल्पना :

"शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी विश्वाचा सविस्तर वेध घेणे आणि मराठी कादंबरीमध्ये शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाचा वेगळेपणा अभ्यासणे व कादंबरीच्या व्याख्या व स्वरूप-संकल्पना स्पष्ट करून शोध घेणे हे क्रमप्राप्त ठरते.

संशोधनपूर्व अभ्यासाचा आढावा :

"शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास" करीत असताना शंकरभाऊ साठे यांची जडणघडण पहात असताना, वर्षानुवर्ष हिंदू समाज व्यवस्थेने नाकारलेल्या एका उपेक्षित समाजात "मांग" या जातीत जन्म झाला. त्यांच्या मागे कोणताही सामाजिक वारसा नव्हता तरी ही आपल्या वाट्याला आलेल्या उपेक्षित जीवनातून त्यानी आपल्या आयुष्यात एकूण बारा कादंबऱ्या लिहून आपली ज्ञानाची उंची गाठलेली आहे.

शंकर भाऊ साठे यांनी लिहिलेल्या कादंबरीतून इंग्रजकालीन समाज व्यवस्था आपणास अभ्यासता येईल. मांग समाजाला एक गुन्हेगारी जमात म्हणून ओळखले जायचे, शंकरभाऊ साठे यांच्या कादंबरीतून मातंग समाजाची होत असलेल्या अवस्थेचे चित्रण आलेले आहे. शंकर भाऊ साठे यांच्या साहित्य लेखणाने मराठी साहित्य विश्वात मातंग आणि तत्सम जाती-जमातीची ओळख होते. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचा बिमोड करून समाजाला स्वाभिमानाची शिकवण दिलेली आहे. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीतील पात्र हे स्वाभिमानी दिलेल्या वचनाला जागणारी, इमानी आहेत.

संशोधन विषयातून मातंग समाजावरील होत असलेले अन्याय-अत्याचाराचे चित्रण वास्तवपणे शंकर भाऊ साठे यांची कसे मांडले आहे याचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी

वाङ्मयाचा जो आलेख आहे त्याची उंची इतर कादंबरीकारांच्या कादंबरीपेक्षा कशी वेगळी आणि चांगली आहे याचा शोध या संशोधनातून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती

“शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास” या विषयाचे संशोधन करीत असताना चरित्रात्मक, ऐतिहासिक, सामाजिक, तौलनिक, सौंदर्यवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी, मानसशास्त्रीय आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

व्याप्ती :

शंकर भाऊ साठे हे महत्त्वाचे कादंबरी लेखक असूनही कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासात त्यांचा साधा नामोल्लेखही केला गेला नाही. त्यांनी उपेक्षित, वंचित, कामगार, गुन्हेगार प्रवृत्तीच्या प्रवृत्तीच्या आणि तत्कालीन इंग्रजी राजवटीचे वास्तवचित्रण त्यांनी केले आहे. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास करताना कादंबरी वाङ्मय प्रकाराची संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये, उदय विकास यांचा अभ्यास करावा लागणार आहे. शंकर भाऊ साठे यांचे जीवन आणि कार्य तत्कालीन परिस्थितीत त्यांच्या साहित्य लेखनाच्या प्रेरणा आणि प्रभाव या घटकांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास करता येत नाही. त्यांच्या अनेक कादंबऱ्या या चरित्रात्मक आहेत. चरित्र वाङ्मयाची संकल्पना नीट समजून घेतल्याशिवाय त्यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास करता येत नाही. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतून आलेले कथानक, व्यक्तिरेखा, त्यांच्या कादंबरीतील संघर्ष, त्यांच्या कादंबरीतील निसर्ग जाणिवा, सामाजिक जाणिवा, भाषाशैली, कादंबरीतील वाङ्मयीन मूल्य या घटकांच्या अनुषंगाने या विषयाचे संशोधन करणे हीच संशोधनाची व्याप्ती आहे.

मर्यादा :

शंकर भाऊ साठे अण्णा भाऊ साठे नंतरचे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी कादंबरी या साहित्यप्रकारात लेखन केले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनात

इंग्रजकालीन राजकीय पट आपल्या डोळ्यासमोर येतो. शंकर भाऊ साठे यांनी अण्णाभाऊंसोबत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत काम केले होते. तत्कालीन समाज प्रबोधनात 'लालबावटा' कलापथकाच्या माध्यमातून त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. या कलापथकात त्यांनी काम केले आहे. शंकर भाऊ साठे आणि तत्कालीन समाजजीवन, शंकर भाऊ साठे जीवन आणि कार्य, शंकर भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास, शंकर भाऊ साठे आणि समकालीन कादंबरी वाङ्मय अशा वेगवेगळ्या अनुषंगाने शंकर भाऊ साठे यांच्या साहित्याचे संशोधन करता येते. परंतु मी 'शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास' याच अनुषंगाने संशोधन करणे ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन आराखडा :

'शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास' हा माझ्या संशोधनाचा विषय असून या संशोधनाचा आराखडा खालीलप्रमाणे मांडता येऊ शकतो.

प्रकरण पहिले -

शंकर भाऊ साठे आणि कादंबरीलेखन

सदरील प्रकरणात शंकर भाऊ साठे यांचे जीवन कार्य कसे होते याचा शोध घेतल्याशिवाय त्यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करता येत नाही. शंकर भाऊ साठे यांचा जन्म, बालपण, शिक्षण, तत्कालीन परिस्थिती, व्यवसाय, प्रेरणा, प्रभाव, संस्कार या घटकांचा या प्रकरणात अभ्यास करावयाचा आहे. या प्रकरणाच्या उत्तरार्धात कादंबरी वाङ्मयाची संकल्पना, व्याख्या, स्वरूप विशेष, उदय विकास या घटकांच्या आधारे या प्रकरणाचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे -

शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप

उपरोक्त प्रकरणात शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप कसे आहे याचा अभ्यास करावयाचा आहे. कादंबऱ्यांतील दारिद्र्याचे चित्रण, गुन्हेगारी प्रवृत्तीचे चित्रण, इंग्रजी राजवटीचा जनमानसावर झालेला परिणाम, तत्कालीन परिस्थिती आणि शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीचा अनुबंध, शंकर भाऊ साठे

यांच्या कादंबरीतील समाजजीवन या अनुषंगाने या प्रकरणाचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे-

शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीतील व्यक्तीचित्रण

शंकर भाऊ साठे यांनी एकूण बारा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या कादंबरीतील व्यक्तिरेखा कशा मांडल्या आहेत हे कादंबरीतून चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा, कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या समस्या, त्यांचे व्यक्तिमत्त्व, चांगल्या आणि वाईट दोन्हीही व्यक्तिरेखेतील साम्यभेदांचा अभ्यास सदरील प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण चौथे-

शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतील संघर्षाचे स्वरूप

सदरील प्रकरण संघर्ष स्वरूप आणि संकल्पना समजून घेण्यासंदर्भातील आहे. व्यक्ती-व्यक्तीतील संघर्ष, व्यक्ती आणि समाजातील संघर्ष, गरीब आणि श्रीमंतातील संघर्ष, कामगार आणि भांडवलदार यांच्यातील संघर्ष स्त्री आणि पुरुषांतील संघर्ष, प्रस्थापित आणि विस्थापितांचे संघर्ष, भूक आणि दारिद्र्याशी संघर्ष, इंग्रज आणि भारतीय लोकांतील संघर्ष अशा प्रकारे शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीत संघर्षाचे स्वरूप या प्रकरणात अभ्यासावयाचे आहे.

प्रकरण पाचवे-

शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाचे वाङ्मयीन विशेष

'शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास' या विषयाच्या अनुषंगाने संशोधन करताना शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीचे कोणकोणते वाङ्मयीन विशेष आहेत याचा शोध सदरील प्रकरणात घ्यावयाचा आहे. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरीतील संवाद, निवेदन शैली, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, वर्णनकौशल्य, प्रतिक-प्रतिमांचा वापर, कादंबरीची भाषाशैली, त्यांच्या कादंबरीतील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषितवजा वाक्य, बोली भाषेचा वापर, कादंबरीतील नाट्यात्मकता या घटकांच्या अनुषंगाने या प्रकरणात अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण सहावे-

मूल्यमापन

सदरील विषयाचा अभ्यास केल्यानंतर त्या अभ्यासाच्या संशोधनातून जे काही निष्कर्ष हाती येणार आहेत ते निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

शेवटी संदर्भ ग्रंथ सूची, परिशिष्ट्ये छायाचित्रे जोडण्यात येतील.

संदर्भग्रंथसूची :

1 महात्मा फुले समग्र वाङ्मय — य. दि . फडके (संपा)

2 मातंग समाजाचे बुद्ध धम्म व आंबेडकरी चळवळीशी नातं-राजेश धापसे

3 माझा भाऊ अण्णा भाऊ — शंकर भाऊ साठे

4 दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र — म. सू. पाटील

5 भारतीय साहित्याची संकल्पना — द. दि. पुंडे

6. शंकर भाऊ साठे व्यक्तित्व आणि कर्तृत्व — डॉ.मारोती कसाब

संशोधक

प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे

दूर व मुक्त अध्ययन संस्था (Idol)

मुंबई विद्यापीठ, मुंबई

मो. न. ८८७९६७२२०९

मार्गदर्शक

डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे

मराठी विभाग प्रमुख

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

ता. उदगीर जि. लातूर

मो. न. ९९२२९६६५२६